# 'टीसीएस आयटी विझ २०१६'मध्ये सेंटर पॉइंट विजेता

## ▪ राष्ट्रीय स्तरावर करणार नागपूरचे प्रतिनिधित्व

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

नागपूर : देशातील अग्रणी बिझनेस सोल्युशन कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)तर्फे 'टीसीएस आयटी विझ २०१६' या राष्ट्रीय शालेय प्रश्न मंजूषा स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेची नागपूर प्रादेशिक फेरी मंगळवारी वसंतराव देशपाडे सभागृहात घेण्यात आली होती. यात सेंटर पॉइंट स्कूल काटोल रोडने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकाविला. तर, शिवाजी सायन्स कॉलेज दुसऱ्या क्रमांकावर राहिले. या फेरीतील विजेता टीम राष्ट्रीय स्तरावर शहराचे प्रतिनिधित्व करणार आहे.

इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या या स्पर्धेत पाच फेऱ्या पार करत सेंटर पॉइंट स्कूल (काटोल रोड) मधील मोहम्मद तहाउद्दीन आणि देवेश राजपूत या १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या टीमने विजेतेपद मिळविले. तर, शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील कुणाल वासनिक आणि ऋत्विक गुप्ते यांच्या टीमने उपविजेतेपद मिळविले. टीसीएस इंटर्नल आयटी अँड शेअर सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष आलोक कुमार यांच्या हस्ते विजेता



टीमला आयपॅड, सुवर्णपदक, स्मृतिचिन्ह तर उपविजेत्या टीमला मिनी आयपॅड, स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. ही स्पर्धा देशभरातील १३ शहरांमध्ये होत असून, एकत्रित होणाऱ्या अंतिम राष्ट्रीय फेरीत विजेती टीम शहराचे प्रतिनिधित्व करणार आहे. माहिती तंत्रज्ञानावर आधारित या प्रश्नमंजूषा स्पर्धेच्या अंतिम फेरीत शहरातून पाच तर रायपूरमधील एक शाळा सहभागी झाली होती. या कार्यक्रमाचे संचालन गिरी सुब्रमण्यम यांनी केले.